
नालय, ठाणे
का. वा.
७१३९

# रानगांवची आगगाडी



IRBK-0109139


सौ. सुमति पायगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[क्र. मा. प.]

16 DEC 1971




अनुक्रम 39.२७८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक
नों. दि.
3030


सौ. सुमति पायगांवकर

व्हीनस प्रकाशन, पुणें २

म. ग्रं. सं. आणि वाचनालय
क्र. ...२७३९ नों. दि ...........
कि. ...१।। ८४.......

मूल्य : [illegible] न. पैसे

IRBK-0109139



आवृत्ति पहिली : १९६१.
सर्व हक प्रकाशकाचे स्वाधीन
चित्रकार : सुधाकर खाजगीवाले.
प्रकाशक : स. कृ. पाध्ये.
व्हीनस प्रकाशन,
४१० शनवार, पुणे २
मुद्रक : य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणें २.



# १ रानगांवची आगगाडी


एक होतें रान.
हिरवें हिरवें रान.
रानांत होतें आंब्याचें झाड.
खूप उंच झाड नी, खूप मोठें झाड.
झाडाला खूप फांद्या होत्या.
झांडाच्या खोडांत ढोली होती.
झाडाच्या बुंध्याशीं बीळ होतें.
झाडाच्या टोंकाला मैनाताईचें घरटें होतें.
झाडाच्या फांदीवर चिमणेदादाचें घरटें होतें.
ढोलींत खारूताईचें घर होतें.
आणि बिळांत उंदीरभाऊचें घर होतें.
चौघेहि मजेंत राहायचे.
बरोबरच फिरायला जायचे.
एकमेकांना जेवायला बोलवायचे.
नी एकमेकांना खाऊ द्यायचे.

एक दिवस गंमत झाली.
छानदार पहाट झाली.
वाऱ्याची गार झुळूक आली.
इतक्यांत लांबून आवाज आला
झुक्-झुक्-झुक्-झुक्- कू-ऊ-कू-ऊ-
भक्—भक्--झुक्--झुक्—, भक्-भक्-,
झुक्—झुक्—कू—उ
चिमणेदादा एकदम ओरडला,





खारूताई ऊठ, आगगाडी आली
मैनाताई ऊठ, आगगाडी आली
उंदीरमाऊ ऊठ, आगगाडी आली
सगळे धांवले आगगाडी पाहायला
खारूताई सुर्र्र पळाली.
मैनाताई भुर्र्र पळाली.
उंदीरमाऊ सुर्र्र पळाला.
लांबून आगगाडी जात होती.
माणूस गांवाहून आली होती.
मोठे इंजीन, मोठा धूर !
मोठे मोठे डबे
त्यात छोटीं, मोठीं माणसें !
आगगाडी ओरडली—




कुक्-कुक्- कू-ऊ-ऊ-ऊ
झुक्-झुक्-भक्-भक्,झुक्-झुक्-
खारूताई म्हणाली–
किती मोठी आगगाडी !
मैनाताई म्हणाली–
किती छान आगगाडी!
ऊंदीरभाऊ म्हणाला--
आपण पण बनवूं आगगाडी.
चिमणेदादा म्हणाला–
खरंच ! हीं माणसें रोज बसतात
आगगाडींत.
आपण पण बसूं आगगाडींत.
खारूताई म्हणाली–
पण डबे कुठून आणायचे?


मैनाताई म्हणाली–
गाडीला चाकें कुठून आणायची ?
चिमणेदादा म्हणाला–
माणूसगांवाला माणसें राहातात
त्यांची मुलें बिस्किटें खातात.
आणि डबे टाकून देतात.
मी आणतो ते डबे.



उंदीरभाऊ म्हणाला—
शिंपीलोक माणसांचे कपडे शिवतात
रिकामी रिळे फेकून देतात.
त्या रिळांचीं चाकें होतील.
मी आणतों तीं रिळें.
खारूताई म्हणाली—
डब्यांना मी चाकें जोडीन.
तारांचे छोटे तुकडे आणीन.
तुकडयांनीं मी डबे जोडीन.
म्हणजे झाली आगगाडी!
मैनाताई म्हणाली—वा, वा !
गाडीला इंजिन नाहीं तें ?
गाडी कशी चालणार ?
खारूताई म्हणाली — खरंच बाई !


गाडी कशी चालणार ?
उंदीरभाऊ म्हणाला—
मी एक रिकामा डबा आणीन.
पत्र्याचा नी गोल गोल डबा.
धुराडें करायला नरसाळें आणीन.
पाणी भरायला छोटी डबी आणीन
या पाण्याची वाफ होईल.
धुराडयांतून धूर जाईल.
भक्—भक्—भक्—भक्!
मैनाताई टाळ्या पिटीत म्हणाली
खरंच! भक्--भक्--भक्--भक् !
सगळेजण मजेंत घरीं आले.
मजेंत ओरडत आले--आगगा
कू--ऊ--ऊ झुक्--झुक् भक--भक..






चिमणदादानें डबे आणले--
एक मोठा नी एक छोटा.
खारूताईनें तारांचे तुकडे आणले.
उंदीरभाऊनें नरसाळें आणलें.
मैनाताई म्हणाली--
पण गाडीला रुळ नाहींत ते !
चाकें कशीं घालणार ?
उंदीरभाऊ म्हणाला--
बरंच कीं, चाकें कशीं चालणार ?
खारूताई म्हणाली--
पण जायचं कुठच्या गांवाला ?
नी या आपल्या गांवाचं नांव काय?
चिमणेदादा म्हणाला, 'इतकचं ना?'
आपल्या गांवाला रानगांव म्हणूं.
आपण जाऊं परीनगरला. सुंदर
पऱ्यांच्या गांवाला.

तिथें काय काय जंमत आहे !
खूप खूप छान छान खाऊ पण आहे.
सगळे टाळ्या वाजवीत म्हणाले--
हो, हो ! चला परीनगरला--
सुंदर पऱ्यांच्या छानदार गांवाला.
मग उंदीरभाऊ नी चिमणेदादा
निघाले. त्यांनीं बारीक बारीक
बांबू आणले. लांब लांब नी खूप
बांबू आणले.



परीनगर पर्यंत रूळ तयार केले
खारूताईनें फराळाचें घेतलें.
भुईमुगाच्या शेंगा नी हिरवे बदाम.
मैनाताईनें फराळाचें घेतलें.
ओला हरबरा नी पिकलेलीं बोरें.




चिमणेदादा रूळ घालून आ
उंदीरभाऊ रूळ घालून आल
थेट परीनगरपर्यंत रूळ झाले.
आतां रानगांवचें स्टेशन करा
मैनाताईनें पिंपळाचें पान आ
मोठें थोरलें पान !
खारूताईनें त्यावर लिहिलें—
आपल्या गोंडेदार शेपटीनें रंग

रा — न — गां — व —


उंदीरभाऊनें एक काठी घेतली.
तिला पान डकवून दिलें.
चिमणे...

सगळी तयारी झाली.
खारूताई डब्यांत बसली.
मैनाताई डब्यांत बसली.
चिमणेदादानें इंजिन चालवलें
उंदीरभाऊनें निशाण दाखवलें.
शिटी फुं...
पी--ओ--पी--ओ--ओ--पः




गाडी चालली परीनगरला
झुक-झुक, झुक-झुक—कू—ऊ
ऊ—ऊ—
शेतें गेलीं - झाडें गेलीं—
गुरें गेलीं - मेंढरें गेलीं—
सारें सारें मागें गेलें—
गाडी - इंजिन पुढें गेलें—
धड्‌डड्—धड्‌ड्‌ड्—कू....
वाटेंत लागलें पोपटपूर.
चिमणेदादानें गाडी थांबवली.
सगळेजण गाडींतून उतरले.
तिथें होती पेरूची राई

झाडावर होते पोपटभाई
पोपटभाईला खूप आनंद झाला.
चिमणेदादा आला.
उंदीरभाऊ आला. खारूताई आली.
मैनाताई आली.




किती तरी दिवसांनीं भेट झाली !
पोपटभाईनें साऱ्यांना
राईत नेलें. बागेंत नेलें.
गुलाबी पेरूच्या राईंत !
लाल डाळिंबांच्या बागेंत!
साऱ्यांचें पोट खूप भरलें.
चिमणेदादा पोपटभाईला
म्हणाला–तूं येतोस
आमच्या आगगाडींत ?
पोपटभाई म्हणाला–
कुठें जायचें पण ?
मैनाताई म्हणाली
अरे परीनगरला जाऊं या.

परीमहाल पाहूं या,
परीराणीला भेटूं या,
गंमत जंमत करूं या
नी मजेंत परत येऊं या.
पोपटभाई म्हणाला–
मी पण येतों, मी पण येतो.
पोपटभाईनं पेरू घेतले,
डाळिंबें घेतलीं. परीराणीला
द्यायचे होते ते !
पोपटपूरहून आगगाडी
निघाली-झुक्-झुक्–भक्-भक्
झुक्-झुक्–भक्-भक्....




ाडी खूप लांब गेली.
ांवत धांवत दूर गेली....
ाड्-धाड्—धडाड्-धडाड्
ओढा आला, नदी आली !
ुलावरून गाडी गेली—
ड़...

विभाग
क्रमांक 3030
नों. दि.


गाडी जरा हळू झाली !
वाटेंत लागली ससेवाडी !
पांढरे पांढरे ससे—
लांब लांब कानाचे,
लाल लाल डोळ्यांचे—
गुलाबी ओठाचे !
गाडीला पाहून घाबरून गेले.


पोपटभाईनें हांका मारल्या—
भिऊं नका - थांबा, थांबा....
मी आलोंय, पोपटभाई !
ही पहा इथें मैनाताई !
सारे ससे थांबले. त्यांना
फार फार आनंद झाला.
त्यांनीं सगळ्यांना मळ्यांत
नेलें. पांढरी पांढरी फुलकोबी.



नी छान गुलाबी गाजरें !
हिरवे हिरवे वाटाणे
नी लाल लाल टमाटे !
एक छोटा ससा म्हणाला—
चिमणेदादा, तुम्ही डब्यांत राहता ?
तुमचे डबे चालतात कसे ?
खारूताई म्हणाली—
अरे वेडया, ती आगगाडी आहे.
ते आगगाडीचे डबे आहेत.
आम्ही चाललों परीनगरला.

छोटा ससा म्हणाला—
खारूमावशी, मी येऊं
तुमच्याबरोबर ?
मैनाताई म्हणाली, चल की !
गंमत आहे, परीनगरला.
छोट्या सशानें आई बाबांना
विचारलें—
आई बाबांनीं जा सांगितलें.
कांहीं वेळानें पाहुणे निघाले.
छोटा ससा पण बरोबर निघाला
परीराणीसाठीं
भेटी घेतल्या. फुलकोबी,
वाटाणे, गाजरें नी टमाटे.
आगगाडी निघाली—
झुक—झुक—झुक—कुक—
भक—भक—भक—भक....
धडऽ. धुडडड —धडऽ.धडडड

एक मैल — दोन मैल —
किती तरी मैल गेले !
ओढा गेला — नदी गेली.
ओढा गेला — टेकडी गेली.
पूल गेला — बोगदे गेले—
कुक—कुक क
हरीण गेले—
बगळे गेले !
सुंदर सुंदर पक्षी गेले !
झुक—झुक—कू ऽऽऽ
परीनगर जवळ आलें.
चिमणेदादानें गाडी हळू केली.
स्टेशनजवळझाडें होतीं—
सुंदर फुलांचीं, सुंदर पानांचीं !
एका रंगीत रिबिनीवर
नांव होतें
प—री—न—ग—र !



दोन छानदार पऱ्या आल्या.
गाडीजवळ उभ्या राहिल्या.
चिमणेदादा म्हणाला–
आम्ही रानगांवहून आलों....
पोपटभाई म्हणाला–
मी पोपटपूरहून आलों.
आम्ही परीनगर
पाहायला आलों!
छोटा ससा म्हणाला–
मी–मी–मी पण आलों.
दोन्ही पऱ्या हंसून म्हणाल्या–
या. या. बाहेर गाडी उभी आहे.
एका परीनें टाळी वाजवली—
चटकन् सहा टिल्ले धांवत आले.
उंच टोपीचे, मोठ्या कानाचे
आणि लांब टोकदार पावलांचे!
त्यांनीं सगळ्यांचे सामान घेतलें.
भेटीच्या करंड्या घेतल्या.
सामान छोट्या खटाऱ्यांत भरलें.
मेंढया जुंपलेला खटारा–
रंगीत रंगीत खटारा!





जवळच सुंदर गाडी होती.
गाडीला करकोचे जुंपले होते.
सगळे पाहुणे गाडीत बसले.
एका टिल्यानें गाडी हाकली,
एक गाडीच्या मागें उभा राहिला.
छोटेसेंच पऱ्यांचें गांव !
छोटे छोटे चॉकलेटचे रस्ते !
छोटीं छोटीं घरं !

साखर पाऱ्याच्या वड्यांच्या
भिंती! शंकरपाळयांचीं कौलं !
मधून मधून ओढे लागत.
गोड गोड सरबतांचे ! त्यांत
लिमलेटचे मासे होते ! मोठे
मोठे नी छोटे छोटे !
खोबऱ्यांच्या वाट्यांच्या
होड्या होत्या.

त्याला कोबीच्या पानांचीं शिडें !
खुजे होड्या वल्हवीत होते.
लांब पलीकडे एक डोंगर होता.
खडीसाखरेचा मोठा डोंगर होता.
सगळीकडे चॉकलेटच्या पायवाटा होत्या.
डोंगरावर अगदीं छोटीं छोटीं झाडें होतीं.
एवढुली–एवढुली–!

कांहींना छान करवंदं होतीं !
कांहींना छान जांभळें होतीं !
कांहींना काजू तर कांहींना आंबे !
डोंगरावर परीराणीचा महाल होता.
मोट्या मोट्या बिस्किटांच्या भिंती !
उंच उंच भिंती ! अनारशांचीं कौलें !
श्रीखंडाच्या वडयांच्या फरशा
पाहुण्यांची गाडी -
महालाशी आली.



पऱ्यांनीं पाहुण्यांना महालांत नेलें.
सगळ्यांनीं हातपाय धुतले.
सगळ्यांनीं कपडे बदलले.
गाडींत ते मळले होते ना !
पोपटभाईनीं नवा हिरवा
कोट घातला.
खारूताई चट्टेरीपट्टेरी साडी नेसली.
मैनाताई तपकिरी रेशमी शालू
नेसली.
चिमणेदादानें चट्ट्यापट्ट्याचा सदरा
घातला.
उंदीरभाऊनें काळा रेशमी सदरा
घातला.
सशानें पांढरा मलमली कोट घातला.
मग सगळे फराळाला बसले—
किसमिसाचे लाडू नी खारकाजू !
शरबताचे पेले नी खव्याची बर्फी !
फराळ झाल्यावर फिरायला
जायच होतं.



ाहिल्यानें सगळे फुलबागेंत गेले.
इसरी फुलें, लाजरी फुलें,
खूप खूप फुलें ! तिथें कांहीं
ऱ्या होत्या. पऱ्या फुलांना
गोष्टी सांगत होत्या–
कांहींना गाणीं म्हणून
दाखवीत होत्या. कांहींचे
लाड करीत होत्या ! कांहीं
फुलांना बरें नव्हतें. डॉ. खुजे
बाटली घेऊन तिथें आले.
आजारी फुलांना
गोड गोड औषध दिलें.
कांहीं फुलांना लागलें होतें.
वाऱ्याशीं खेळतांना लागले होते !
लागलेल्या फुलांना पट्ट्या बांधल्या.
पाहुण्यांना पाहून फुलें म्हणालीं–
आम्हाला गोष्टी सांगा....गोष्टी
सांगा....तुमच्या गांवच्या गोष्टी
सांगा ना !....मग मैनाताईनें
गोष्टी सांगितल्या.
खारूताईनें गोष्टी सांगितल्या.
नंतर पाहुणे दुसरीकडे गेले.





तिथें खूप फुलपांखरें होती.
कांहीं पऱ्या त्यांना रंग देत होत्या.
कांहीं टिल्ले रंगपात्रें घेऊन उभे होते.
कांहीं फुलपाखरांना नवे पंख बसवले. निळे नी जांभळे, रुपेरी नी सोनेरी!
कांहीं फुलपांखरांनीं मध आणला.
मधमाशांकडून मध आणला.
सुंदर सुंदर सुरयांत भरला,
कांहीं फुलपांखरांनीं दंवाचे थेंब आणले.
चिमुकल्या चिमुकल्या चंबूंत भरले.
यानंतर पाहुणे म्हणाले—चला आतां परीराणीकडे.
परीराणी महालांत होती.
मऊ मऊ पिसांच्या बैठकी—
मोठाल्या सूर्यफुलांचीं टेबलें!



मध्ये ऊंचावर परीराणी बसली होती—

एका मोठमा कमळाच्या फुलां[illegible]

ती बसली होती.

तिनें झगमग कपडे घातले हो[illegible]

भरजरी कपडे घातले होते.

महालांत खूप लखलखाट होता

[illegible] दिवे !

नीलमण्यांचे नी पाचूचे !

दारांना [illegible]

[illegible] ना जरतार

खिडक्यांच्या पडद्यांना मोत्यां[illegible]

झालरी !

परीला पाहुण्यांनीं भेटी दिल्या.

तिला त्या खूप आवडल्या.

मग पोपटभाई म्हणाला—


आम्हाला परीनगर फार आवड[illegible]

छोटा ससा भीत भीत म्हणाल[illegible]

मला तर — मला तर—

फुलपांखरे - ऊं....ऊं....फार
आवडली ! परीराणीला हसूं आलें.
सगळ्यांना हसूं आलें.
परीराणीनें सशाला मांडीवरच घेतलें.
मग सगळ्यांनीं खूप खूप गप्पा
मारल्या.
तितक्यांत दोन पऱ्या आल्या.
नमस्कार करून म्हणाल्या —
'राणी सरकार — मेजवानीची तयारी
आहे.'
सगळे मेजवानीच्या खोलींत गेले.
सगळेजण बैठकीवर बसले.

सूर्यफुलाच्या एका टेबलावर
सगळें मांडलें होतें.
शरबतांच्या सुरया नी दवांचे चंबू !
काजूची चिकी
नी पिस्त्यांचा हलवा !
अक्रोडाचा चिवडा नी
बदामाच्या काचऱ्या !
मध भरलेलीं द्राक्षें नी गोड गोड
आंबे ! घट्ट आइस्क्रीम
भरलेले लाल लाल सफरचंद !
मेजवानीचा थाट होता.
सगळ्यांनीं पोटभर खाल्लें.



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



मग दिवाणखान्यांत गंमत
जंमत होती.
कमळांच्या पाकळ्यांचे गालिचे!
पऱ्या दारूकाम उडवत होत्या.
अनार नी चंद्रज्योती !
टिल्यांनीं वाद्यें वाजवलीं—
मुरली नी सनई, डफ नी
सारंगी. पऱ्यांनीं नाच केला—

परीराणी मध्यें
नाच करीत होती.
पऱ्यांनी फेर धरला होता.
नाच फारच सुंदर होता. छुम्–
छुम – रूम् – झुम्–झनक–
पाहुणे मंडळींनीं टाळ्या पिटल्
वा -- वा – छान–छान !
फारच छान – फारच छान !



मग दिवाणखान्यांत गंमत
जंमत होती.
कमळांच्या पाकळ्यांचे गालिचे!
पऱ्या दारूकाम उडवत होत्या.
अनार नी चंद्रज्योती !
टिल्यांनीं वाद्यें वाजवलीं—
मुरली नी सनई, डफ नी
सारंगी. पऱ्यांनीं नाच केला—
परीराणी मध्यें
नाच करीत होती.
पऱ्यांनी फेर धरला होता.
नाच फारच सुंदर होता. छुम्—
छुम – रुम् – झुम्—झनक—
पाहुणे मंडळींनीं टाळ्या पिटल्या.
वा -- वा – छान—छान !
फारच छान – फारच छान !




दुसरा दिवस उजाडला.
पाहुणे मंडळी परत
जायला निघाली.
परीराणीनें खूप भेटी दिल्या.
स्वतःच्या पंखांचीं मऊ मऊ पिसें !
सोनेरी....सोनेरी !
चांदण्यांचे हार दिले.
चंदेरी – चंदेरी !....

टोपल्या भरून वेलदोडे दिले.
मध भरलेलीं द्राक्षें दिली.
घट्ट आइस्क्रिम
भरलेले सफरचंद दिले.
दंव भरलेले चंबू नी सरबतांच्या
सुरया ! सगळी मंडळी
स्टेशनवर आली. पऱ्या आल्या टिल्ले
पण आले. सगळें सामान गाडींत
भरलें. सगळेजण गाडींत बसले.
मैनाताई बसली.
खारुताई बसली.
छोटया, सशाला रडूंच आलें !
तो हुंदके देत म्हणाला–
परीराणी ! माझी आठवण ठेव हं
मी पुन्हां कधीं येऊं ?
परीराणी त्याला थोपटून म्हणाली–



पुन्हां आगगाडी आली कीं
जरूर ये. इतक्यांत शिट्टी
वाजली....पी—ई—ईई—प्
पी—ई—ई—ई—ई—प्
घंटा वाजली, टण्—टण्—टण्——
चिमणेदादानें इंजिन चालवलें—
ऊंदीरभाऊनें निशान दाखवलें.
झुक-झुक-झुक-झुक-कुक-कुक-
गाडी सुटली—गाडी सुटली——

परीराणी म्हणाली——टा टा....
पऱ्या म्हणाल्या——टा टा....
इतक्यांत डॉ. खुजे धांवत आले
ते पण म्हणाले——टा टा....
टिल्ले म्हणाले——टा टा....
सगळ्यांनीं रुमाल हलवले.
गाडी निघाली—गाडी निघाली
रानगांवला परत निघाली.
परीनगरला जाऊन आली.
गंमत जंमत पाहून आली !
छुक—छुक—छुक—छुक....
छुक—छुक—छुक—छुक....
छुक—छुक—भक—भक....
आगगाडी — आगगाडी —
धडडड — धडडड — धडडड
कुक—कुक—कुक—ऊ—ऊ



IRBK-0109139

# आमचें बालवाङ्मय

| | |
|---|---|
| मिनीची बाहुली | : सौ. सुमति पायगांवकर |
| नाना गोष्टी | : ना. ग. नारळकर |
| गंमत जंमत | : राजा मंगळवेढेकर |
| पोपटदादाचें लग्न | : सौ. सुमति पायगांवकर |
| सुंदर आमचा गांव | : जोशी – निर्मळ |
| माणिक आणि मोती | : शं. रा. देवळे |
| छान छान गीतें | : सौ. उषा देशमुख |
| फाट्ट फुट्ट धुम् | : सौ. सुमति पायगांवकर |
| जंगलाची हांक | : बाबा पाटील |
| लिली बाहुली | : वि. स. गवाणकर |
| पक्ष्यांच्या गोष्टी [भाग १ ते ३] | : पां. पि. घरत |
| दुबळी माणसें | : वा. रा. सोनार |


हीनस प्रकाशन : पुणें

४१० शनवार पेठ : पुणें २